# कापूरबावडी वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ १७८ /२०२४ दि. १७/०९/२०२४

**—: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :—**

**ज्याअर्थी, कापूरबावडी** वाहतूक उप विभागाचे हद्दीत दि. १९/०९/२०२४ रोजी **राज्य उत्पादन शुल्क विभागातील रिक्त जवान व जवान–नि–वाहन चालक पदांची भरती प्रक्रियेसाठी उमेदवारी मैदानी चाचणी** घेण्याचे नियोजित असलेबाबत अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, ठाणे यांचे कार्यालयाकडील जा.क्र. इएसटी/११२०२४/जवान भरती/क्र.–५, दि. १२/०९/२०२४ अन्वये पत्र प्राप्त आहे. सदर मैदानी चाचणीतील १.५ किमी. व १ किमी. धावण्याची चाचणी बाळकुम पाईपलाईनच्या मधील रस्त्यावरून घेणे निश्चित करण्यात आले आहे. सदर वेळी २५९ उमेदवारांची मैदानी चाचणी घेण्यात येणार आहे. सदर वेळी उमेदवार साकेत कडून बाळकुम कडे जाणारा मुख्य रस्ता ओलांडून जाणार आहेत. सदर रस्ता बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई यांचे अखत्यारीत येत आहे. नमूद मार्गाचा आजूबाजूचे परिसरातील रहिवासी मॉर्निंग वॉकसाठी, पायी ये–जा करण्यासाठी वापर करीत असतात. साकेत कडून बाळकुम कडे जाणारा हा मुख्य रस्ता असून सदर रस्त्यावर वाहतुकीची वर्दळ असते. सदर मार्ग राज्य उत्पादन शुल्क विभागातील रिक्त जवान व जवान–नि–वाहन चालक पदांची भरती मैदानी चाचणीचे अनुषंगाने पादचारी तसेच वाहतुकीकरीता बंद करणे आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :—

**प्रवेश बंद —** १) साकेत – बाळकुम मार्गावरील ग्लोबल हॉस्पीटल समोरील पाईपलाईन मार्गे दादलानी रोड कडे जाणारे आणि बाळकुम कडे जाणारे पादचारी, सर्वसामान्य नागरिक तसेच सर्व प्रकारच्या वाहनांना **ग्लोबल हॉस्पीटल समोर 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग —** सदर मार्गावरून जाणारे पादचारी, सर्वसामान्य नागरिक तसेच सर्व प्रकारची वाहने साकेत बाळकुम रोड येथील महालक्ष्मी मंदिर येथून डावीकडे वळून नाशिक – मुंबई महामार्गावरून साकेत पंक्चर मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद —** २) दादलानी रोड कडून पाईपलाईन मार्गे ग्लोबल हॉस्पीटल कडे येणारे पादचारी, सर्वसामान्य नागरिक तसेच सर्व प्रकारच्या वाहनांना **मल्टिकार वर्कशॉप, तरबेज इंटरप्रायजेस दादलानी रोड समोरील बृहन्मुंबई महानगरपालिका पाईपलाईन रोड येथे 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग —** सदर मार्गावरून जाणारे पादचारी, सर्वसामान्य नागरिक तसेच सर्व प्रकारची वाहने दादलानी रोड, बाळकुम रोड मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद —** ३) बाळकुम कडून साकेत कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **लोढा सोसायटी येथून बाहेर पडणारे बाळकुम – साकेत रोड येथे 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग —** सदर मार्गावरून जाणारे पादचारी, सर्वसामान्य नागरिक तसेच सर्व प्रकारची वाहने उजवे वळण घेवून लोढा सोसायटी माजिवडा मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद —** ४) रूस्तमजी समोर पाईपलाईन मार्गे ग्लोबल हॉस्पीटलकडे जाणारे पादचारी, सर्वसामान्य नागरिक तसेच सर्व प्रकारच्या वाहनांना **रूस्तमजी बिल्डींग समोर 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग —** सदर मार्गावरून जाणारे पादचारी, सर्वसामान्य नागरिक तसेच सर्व प्रकारची वाहने उजवे वळण घेवून लोढा सोसायटी माजिवडा मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना दि. १९/०९/२०२४ रोजी **'राज्य उत्पादन शुल्क भरती प्रक्रिया'** सकाळी ०६:०० वा. ते सायंकाळी १८:०० वाजेपावेतो अंमलात राहील. तसेच सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सिजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( पंकज शिरसाट )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/— सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर,**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ — ५ वागळे इस्टेट व विशेष शाखा, ठाणे


**प्रत कार्यवाहीसाठी :—**

प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे

**प्रत** :— पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/— सदर अधिसूचना नागरिकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**प्रत** :— समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/— सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी

**प्रत** :— सपोआ वाहतूक विभाग, ठाणे, वागळे व प्रभारी अधिकारी, कापूरबावडी, कळवा, नारपोली, वागळे, वाहतूक उप विभाग
२/— म.न.पा.ठाणे च्या संबंधित अधिकाऱ्यांकडून आवश्यक सूचना फलक लावून घ्यावीत.




राज्य उत्पादन शुल्क भरती अधिसुचना
दि. १५.०५.२०२४